सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६० चा मुंबई अधिनियम, क्रमांक १०

# मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९

( २ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित )

## Bombay Act No. X of 1960

# The Bombay Prevention of Begging Act, 1959

*( As Modified upto the 2nd November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत : रुपये ५·०० ]

# मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९.

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे पृष्ठे

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ आणि तत्सम विधि व उपबंध रद्द करणे .. १

२. व्याख्या .. २

**प्रकरण दोन**

**भिकारी व अपराधी भिकारी यांची व्यवस्था लावण्याबाबत कार्यरीति**

३. न्यायालयांचे अधिकार .. ३

४. भीक मागताना आढळून आलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार. .. ४

५. भीक मागताना आढळलेल्या व्यक्तीच्या बाबतीत संक्षिप्त चौकशी व त्यांना अटकावून ठेवणे. .. ४

६. भिकारी म्हणून अटकावून ठेवल्यानंतर भीक मागितल्याबद्दल शास्ती. .. ५

७. अपराधांची संक्षिप्त चौकशी करणे. .. ६

८. आईबापांनी खर्चाबाबत रकमा देणे. .. ६

९. सर्वस्वी भिकाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा न्यायालयास अधिकार आहे. .. ६

१०. असाध्य रोग जडल्यामुळे असहाय्य भिकाऱ्यांना आणखी अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. ७

११. भीक मागण्याकरिता व्यक्तीस कामावर लावल्याबद्दल किंवा त्यांना भीक मागण्यास लावल्याबद्दल किंवा भीक मागण्याच्या कारणांसाठी त्यांचा उपयोग केल्याबद्दल शास्ती. .. ७

**प्रकरण तीन**

**आदान केंद्रे व प्रमाणित संस्था**

१२. आदान केंद्राची तरतूद. .. ७

१३. प्रमाणित संस्थांची तरतूद. .. ८

१४. निरीक्षक समित्या. .. ८

१५. सल्लागार समित्या. .. ८

अनुक्रमणिका–चालू


| कलमे, | | पृष्ठे |
|---|---|---|
| १६. | स्थानिक प्राधिकरणांनी अंशदानाच्या रकमेचा भरणा करणे. | ९ |
| १७. | मुख्य निरीक्षक, अपर मुख्य निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक व परिवीक्षा अधिकारी यांची नेमणूक. | ९ |
| १८. | आदान केंद्रे व प्रमाणित संस्था यांतील झडती . | ९ |
| १९. | व्यवस्था व शिस्त. | १० |
| २०. | शिस्तभंगाबद्दल कैदेची शिक्षा. | १० |
| २१. | एका आदान केंद्रातून किंवा प्रमाणित संस्थेतून दुसऱ्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत स्थानांतरण. | १० |
| २२. | लायसनवर सोडून देणे. | १० |
| २३. | लायसन रद्द करणे. | १० |
| २४. | बिनशर्त सोडून देणे | ११ |


## प्रकरण चार

## संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| २५. | अटकावून ठेवल्याचा आदेश दिल्यावर किंवा कैदेची शिक्षा दिल्यावर अनुसरावयाची कार्यरीती. | ११ |
| २६. | महारोगी व वेडे यांची वैद्यकीय तपासणी व त्यांस अटकावून ठेवणे. | ११ |
| २७. | आदान केंद्रातून किंवा प्रमाणित संस्थेतून पळून जाणाऱ्या इसमास अटक. | १२ |
| २८. | प्रमाणित संस्था व भारताच्या निरनिराळ्या भागातील तशाच प्रकारची संस्था यांच्या दरम्यान स्थानांतरण. | १२ |
| २९. | बोटांचे ठसे घेण्याचा अधिकार. | १३ |
| ३०. | भिक्षा मिळविण्यासाठी किंवा काढून घेण्यासाठी उघडी केलेली किंवा प्रदर्शित केलेली जनावरे धरणे व त्यांची विल्हेवाट लावणे. | १३ |
| ३१. | अपराध दखली व जामीन घेण्यास अयोग्य असे समजणे. | १४ |
| ३२. | व्यक्ती लोकसेवक समजणे. | १४ |
| ३३. | सन १८९८ चा अधिनियम ५ अन्वये घेतलेली बंधपत्रे | १४ |
| ३४. | अपिले. | १४ |
| ३५. | नियम. | १४ |
| ३६. | अडचणी दूर करणे | १५ |
| ३७. | अनुसूची | १६ |

# सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १०[१]

## [ मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९५९ ]

[ ८ फेब्रुवारी, १९६० ]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांन्वये अनुकूलन, सुधारणा व फेरबदल करण्यात आल्या आहेत : —

महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५* (१३-२-१९७६) §

**मुंबई राज्यांत भीक मागण्यास प्रतिबंध करण्यासाठीं आणि तत्संबंधित गोष्टींसाठी एकसारखी व अधिक चांगली तरतूद करण्याच्या कारणाकरितां भिकाऱ्यांसंबंधींचा कायदा एकत्रित करण्याबाबत व सुधारण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यांत भीक मागण्यास प्रतिबंध करणें, भिकारी व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या लोकांस विवक्षित संस्थांमध्यें अटकावून ठेवणें, प्रशिक्षण देणें व कामावर लावणें आणि अपराधी भिकाऱ्यांस अभिरक्षेत ठेवणे, त्यांचा इन्साफ करणे व त्यांस शिक्षा देणें या गोष्टींबाबत एकसारखी व अधिक चांगली तरतूद करणे आणि त्या व इतर कारणांकरितां भिकाऱ्यांसंबंधींचा कायदा एकत्रित करणें व सुधारणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे : —

## प्रकरण एक

### प्रारंभिक.

**१.** (१) या अधिनियमास मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र १९५९, भाग पाच पृ. ३८६ (इंग्रजी) पहा

* सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ५ द्वारे सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक तीन निरसित करण्यात आला.

§ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभीचा दिनांक दर्शविते.

प्रारंभ आणि तत्सम विधि व उपबंध रद्द करणे.

(२) तो संबंध [1] [महाराष्ट्र शासन ] लागू आहे.

(३) तो राज्याच्या ज्या कोणत्याहि क्षेत्राच्या बाबतीत राज्य शासन राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे ठाबाबत जो दिनांक त्या [2] [दिनांकास ] क्षेत्रांत अंमलात येईल.

(४) पोट-कलम (३) मध्यें तरतूद केलेल्या रीतीने राज्याच्या कोणत्याही क्षेत्रांत हा अधिनियम अंमलांत आल्यावर, त्या क्षेत्रांत अंमलांत असलेले सर्व तत्सम विधि (अनुसूचीमध्यें नमूद केलेल्या विधिंचा, त्या अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभांत निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, समावेश करुन) रद्द होतील ;

परंतु, अशा प्रकारे विधि रद्द करण्यात आले तरीही, अशा रीतीने रद्द करण्यांत आलेल्या कोणत्याही विधिअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना (यांत, केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली, चालविलेली, प्रमाणित केलेली, पसंत केलेली व मान्यता दिलेली आदान केंद्रे व संस्था, दिलेली अधिकारपत्रे, दिलेले अधिकार व लादलेली कर्तव्ये, नेमलेल्या किंवा रचना केलेल्या समित्या, दिलेली लायसन्से काढलेल्या अधिसूचना व केलेले नियम यांचा समावेश होतो) या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल , तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये करण्यात आली आहे असे समजले पाहिजे; आणि ती, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा उपाययोजनेद्वारे रद्द करण्यात आली नसेल तर आणि रद्द करण्यात येईपर्यंत त्याप्रमाणे अंमलांत राहील. आणि उपरोक्त उपबंधांस बाध येऊ न देता आणि आणि त्यास अधीन राहून, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, असा कोणताही विधि रद्द करण्याच्या बाबतीत लागू होईल, आणि असा विधि त्या कलमाच्या अर्थानुसार अधिनियम नसेल तर ते कलम, जणूं काही तो विधि त्या कलमाच्या अर्थानुसार अधिनियम असल्याप्रमाणे त्याच्या बाबतीत लागू होईल.

व्याख्या.

२. (१) ह्या अधिनियमांत, संदर्भावरुन अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर,–

(१) " भीक मागणे " म्हणजे–

(क) सार्वजनिक जागेत भिक्षा मागणे किंवा घेणें, मग ती गाणें, नाचणें, भविष्य सांगणे, खेळ करुन दाखविणे किंवा वस्तु विकणें यांच्या मिषानें मागितलेली अगर घेतलेली असो वा नसो ;

(ख) भीक मागण्याच्या किंवा घेण्याच्या कामासाठी कोणत्याहि खासगी जागेंत प्रवेश करणें ;

(ग) भीक मिळविण्याच्या किंवा काढून घेण्याच्या उद्देशाने मनुष्यप्राण्याचे किंवा जनावरांचे कोणतेहि क्षत, जखम, दुखापत, व्यंग किंवा रोग लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आणणें किंवा त्याचें प्रदर्शन करणें ;

(घ) उपजीविकेचे कोणतेहि दृश्य साधन नसता कोणत्याहि सार्वजनिक जागेच्या आसपास किंवा जागेत अशा स्थितीत अगर रीतीने भटकणे किंवा राहणें कीं ज्यायोगें तसें करणारा इसम हा भिक्षा मागून किंवा घेऊन जगत असावा ही गोष्ट संभवनीय वाटते ;

---

१. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १ एप्रिल १९६० पासून उक्त अधिनियम पुढील क्षेत्रांत अंमलात येईल : –

(क) मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, यांत व्याख्या केलेला " बृहन्मुंबई " भाग.

(ख) वसई-ठाणा खाडीनें व्याप्त असलेला ठाणें तालुक्याचा भाग, तत्संबध्द जल प्रांगणाचा समावेश करुन.

(ग) मध्य रेल्वेचा भाग धरुन, ठाणें रेल्वे स्टेशनच्या पलीकडील ठिकाणापासून कल्याण रेल्वे स्टेशनपर्यंतच्या भागातील रेल्वेच्या जमिनीच्या सीमा.

(घ) पश्चिम रेल्वेचा भाग धरुन, भायंदर रेल्वे स्टेशनच्या पलीकडील ठिकाणापासून विरार रेल्वे स्टेशनपर्यंतच्या भागांतील रेल्वेच्या जमिनीच्या सीमा.

(ङ) कुलाबा जिल्ह्याच्या उरण महालांतील घारौरी गांवांतील भूमापन क्रमांक ६५ मध्ये अंतर्भूत असलेल्या " एलिफन्टा केव्हस् ".

(च) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, याच्या अर्थानुसार अहमदाबाद शहर.

(दिनांक ८ मार्च १९६० ची कामगार व समाज कल्याण विभागाची सरकारी अधिसूचना क्रमांक आय्.एन्.टी. ४४५९-एम्. पहा).

(ङ) भिक्षा मागण्याच्या किंवा घेण्याच्या कारणासाठी प्रदर्शनाची वस्तु म्हणून आपला उपयोग करुं देणे ; परतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही : —

कोणत्याही विधिअन्वये अधिकृत केलेल्या कार्यासाठी किंवा बृहन्मुंबईत पोलीस कमिशनरने आणि इतरत्र जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने, अगर राज्याच्या कोणत्याही भागात राज्य शासनाने विहित केलेल्या रीतीने अधिकृत केलेल्या कार्यासाठी पैसा किंवा अन्न किंवा देणग्या मागणे किंवा घेणें ;

(२) " प्रमाणित संस्था " या संज्ञेचा अर्थ, भिकारी व त्यांच्यावर अवलंबून असलेले लोक यांस अटकावून ठेवणें, प्रशिक्षण देणे व कामावर लावणें या प्रयोजनार्थ राज्य शासनाने काढलेली व चालविलेली कोणतीहि संस्था, असा समजावा व तींत कलम १३, पोट-कलम (१) अन्वये अशी संस्था म्हणून प्रमाणित केलेल्या संस्थेचा समावेश होतो ;

(३) " मुख्य निरीक्षक " म्हणजे कलम १७, पोट-कलम (१) अन्वये नेमलेला प्रमाणित संस्थांचा मुख्य निरीक्षक; आणि त्यास त्या कलमान्वये नेमलेल्या अधिक मुख्य निरीक्षकाचा समावेश होतो ;

(४) " मूल " या शब्दाचा अर्थ, त्यास जो अर्थ मुंबई बाल अधिनियम, १९४८ मध्ये दिला आहे तोच असेल ;

(५) " न्यायालय " या संज्ञेचा अर्थ, कोणत्याहि वर्गाच्या न्यायिक फौजदारी न्यायधिशाचे न्यायालय, किंवा हा अधिनियम ज्या क्षेत्रात अंमलात असेल त्या क्षेत्रात फौजदारी क्षेत्राधिकार चालविणारे इतर कोणतेहि न्यायालय, असा समजावा ;

१९४८ चा मुंबई ७१.

(६) " बाल-न्यायालय " या संज्ञेचा अर्थ, त्यास जो अर्थ, मुंबई बाल अधिनियम, १९४८ मध्ये दिला आहे तोच असेल ;

(७) " विहित " म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

(८) " परिवीक्षा अधिकारी " या संज्ञेचा अर्थ, कलम १७, पोट-कलम (१) अन्वये नेमलेला परिवीक्षा अधिकारी, असा समजावा ;

(९) " सार्वजनिक जागा " या संज्ञेत आगगाडीच्या डब्याचा समावेश होतो ;

(१०) " आदान केंद्र " या संज्ञेचा अर्थ, भिकारी दाखल करुन घेऊन त्यांस तात्पुरते अटकावून ठेवण्यासाठी राज्य शासनाने काढलेली संस्था किंवा आदान केंद्र म्हणून कलम १२, पोट-कलम (१) अन्वये प्रमाणित केलेली संस्था असा समजावा ;

(११) " अधीक्षक " या संज्ञेचा अर्थ, यथास्थिती, आदान केंद्राचा किंवा प्रमाणित संस्थेचा अधीक्षक, असा समजावा.

(२) ज्या कोणत्याहि क्षेत्रांत हा अधिनियम अंमलांत आणला असेल त्या क्षेत्रात अंमलात नसलेल्या केंद्रीय किंवा मुंबई अधिनियमाच्या किंवा त्यांच्या उपबंधांच्या कोणत्याहि उल्लेखाचा अर्थ त्या क्षेत्रांच्या संबंधांत, त्यात अंमलांत असलेल्या तत्सम विधिचा (कोणताही असल्यास) उल्लेख आहे असा लावला पाहिजे.

## प्रकरण दोन

भिकारी व अपराधी भिकारी यांची व्यवस्था लावण्याबाबत कार्यरीती.

३. ह्या अधिनियमान्वये न्यायालयांस दिलेले अधिकार उच्च न्यायालय, सेशन न्यायालय, प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश किंवा बाल-न्यायालय किंवा क्षेत्रांत फौजदारी क्षेत्राधिकार चालविणारे इतर कोणतेहि न्यायालय यांनीच फक्त चालविले पाहिजेत व ते अशा न्यायालयांनाच चालविता येतील, मग प्रकरण त्यांच्यापुढे प्रारंभतः येवो किंवा अपिलांत येवो किंवा फेरतपासणीसाठी येवो. न्यायालयांचे अधिकार.

भीक मागतांना आढळून आलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

४. (१) भीक मागतांना आढळून आलेल्या कोणत्याही व्यक्तीस अधिपत्रावाचून अटक करण्याचा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने केलेल्या नियमांनुसार याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याही इसमास अधिकार आहे :

परंतु, भीक मागण्याच्या किंवा घेण्याच्या कारणासाठी कोणत्याही खाजगी जागेत प्रवेश करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अशा जागेचा भोगवटा करणाराने तक्रार केल्यावाचून अशा रीतीने अटक करता कामा नये किंवा त्याच्याविरुध्द ह्या अधिनियमान्वये कोणतीही कारवाई चालविता कामा नये.

(२) अशा पोलीस अधिकाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने, अशा रीतीने अटक केलेल्या व्यक्तीस न्यायालयात नेले पाहिजे किंवा त्यास तेथे पाठविले पाहिजे.

(३) *दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१ याचे उपबंध, या कलमान्वये केलेल्या प्रत्येक अटकेच्या बाबतीत लागू असतील, आणि अटक केलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करण्यात येईपर्यंत पोलीस ठाणे किंवा विभाग (सेक्शन) स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्याने त्यास विहित केलेल्या रीतीने ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

भीक मागत असतांना आढळलेल्या व्यक्तीच्या बाबतीत संक्षिप्त चौकशी व त्यांना अटकावून ठेवणे.

५. (१) निकटपूर्वीच्या कलमान्वये न्यायालयापुढे हजर केलेल्या व्यक्तीस या अधिनियमान्वये पूर्वी प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्यात आले होते असे सिध्द करण्यात आले नसेल तेव्हा, न्यायालयाने ती भीक मागतांना आढळलेला होती अशा त्याच्यावर ठेवलेल्या आरोपासंबंधी विहित केलेल्या रीतीने संक्षिप्त चौकशी केली पाहिजे.

(२) जर पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेली चौकशी ताबडतोब पुरी करता येत नसेल तर, न्यायालयास अशा चौकशीचे काम वेळोवेळी तहकूब ठेवण्याचा आणि त्या व्यक्तीस परत पाठवून सोईस्कर अशा जागेत व अभिरक्षेत ठेवण्याबद्दल आदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेली चौकशी केल्यावर, अशी व्यक्ती भीक मागतांना आढळलेली होती याबद्दल न्यायालयाची खात्री न झाल्यास, त्यास ताबडतोब सोडून देण्यांत यावे असा आदेश न्यायालयाने दिला पाहिजे.

(४) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेली चौकशी केल्यावर, अशी व्यक्ती भीक मागतांना आढळलेली होती अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, अशी व्यक्ती भिकारी आहे असा निर्णय न्यायालयाने नमूद केला पाहिजे.

[1][(५) निकटपूर्वीच्या पोट-कलमान्वये भिकारी म्हणून आढळून आलेल्या व्यक्तीस एक वर्षाहून कमी नाही परंतु तीन वर्षाहून अधिक नाही इतक्या मुदतीपर्यंत प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याबद्दल न्यायालयाने आदेश दिला पाहिजे :

परंतु, प्रकरणातील एकंदर परिस्थितीवरून न्यायालयाची अशी खात्री होईल की, वर सांगितल्याप्रमाणे भिकारी म्हणून आढळून आलेली व्यक्ती पुनः भीक मागण्याचा संभव नाही तर, अशा भिकाऱ्याकडून किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून मुचलका घेऊन व अशा भिकाऱ्यास योग्य ती ताकीद देऊन त्यास सोडून देण्याचा न्यायालयास अधिकार आहे. हा मुचलका असा भिकारी भीक मागणार नाही व चांगली वर्तणूक ठेवील अशा अर्थाचा असला पाहिजे व तो न्यायालय फर्मावील त्याप्रमाणे जामिनानिशी किंवा जामिनावाचून असेल.]

* फौजदारी प्रक्रिया संहिता (१९७४ चा दोन) पहावे.

१. सन १९७६ चा महा. अधि. क्र. १५, कलम २(१) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम दाखल करण्यात आले.

(६) या अधिनियमाच्या उपबंधांन्वये कोणताही आदेश देतांना [1][न्यायालयाने पुढील गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत], त्या म्हणजे :—

(क) भिकाऱ्याचे वय व शील,

(ख) भिकारी ज्या परिस्थितीत व अवस्थेत राहत होता ती परिस्थिती व अवस्था,

(ग) परिवीक्षा अधिकाऱ्याने दिलेले प्रतिवृत्त, आणि

(घ) न्यायालयाच्या मतें भिकाऱ्याच्या हिताच्या दृष्टीने ज्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत त्या इतर गोष्टी.

(७) परिवीक्षा अधिकाऱ्यांचे प्रतिवृत्त किंवा न्यायालयाने निकटपूर्वीच्या पोट-कलमान्वये विचारांत घेतलेले इतर कोणतेही प्रतिवृत्त गुप्त स्वरुपाचे आहे असे समजले पाहिजे :

परंतु, जर असे प्रतिवृत्त, त्या भिकाऱ्याचे शील, आरोग्य किंवा वर्तन, किंवा तो भिकारी ज्या परिस्थितीत व अवस्थेत राहत असेल ती परिस्थिति व अवस्था यासंबंधी असेल तर, न्यायालयात जर इष्ट वाटेल तर त्या प्रतिवृत्ताचा गोषवारा भिकाऱ्यास किंवा (अवलंबून असलेल्या, व्यक्तींच्या बाबतीत) संबंधित पालकास कळविण्याचा त्यास अधिकार आहे आणि यथास्थिति, त्या भिकाऱ्यास किंवा पालकास, त्या प्रतिवृत्तांत नमूद केलेल्या गोष्टींशी संबंधित असलेला पुरावा हजर करण्याची संधी दिली पाहिजे.

(८) पोट-कलम (५) अन्वये दिलेल्या आदेशाची एक प्रत मुख्य निरीक्षकाकडे ताबडतोब पाठविण्यात आली पाहिजे.

(९) ह्या कलमांत काहीही असले तरी, वर सांगितल्याप्रमाणे भिकारी म्हणून आढळून आलेली व्यक्ती ही जर पांच वर्षे वयाहून कमी नाही इतक्या वयाचे मूल असेल तर, न्यायालयाने त्यास बाल-न्यायालयाकडे पाठविले पाहिजे व पोट-कलम (५) अन्वये कोणताही आदेश देता कामा नये. मुंबई बाल अधिनियम, १९४८, कलम ४०, कंडिका (अ) यात वर्णन केल्याप्रमाणे ते मूल आहे असे समजून, बाल-न्यायालयाने अशा मुलाची उक्त कलमान्वये व्यवस्था केली पाहिजे. अशा इसमाची वयाबद्दल खात्री करून घेण्याकरिता आवश्यक वाटल्यास अशा भिकाऱ्यास वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासून घेवविण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

भिकारी म्हणून अटकावून ठेवल्यानंतर भीक मागितल्याबद्दल शास्ति.

६. (१) या अधिनियमान्वये ज्यास पूर्वी प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्यात आले असेल असा कोणी इसम भीक मागतांना आढळून आला तर, त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, ह्या कलमांत यापुढे सांगितल्याप्रमाणे शिक्षा होईल.

(२) जेव्हां एखादी व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये प्रथमच दोषी ठरविण्यांत आली असेल तेव्हां, तिस दोन वर्षाहून कमी नाही व तीन वर्षाहून अधिक नाही इतक्या मुदतीपर्यंत प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालय देईल.

(३) जेव्हां एखादी व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषी ठरविण्यांत आला असेल तेव्हां, त्यास प्रमाणित संस्थेत दहा वर्षे अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालय देईल आणि अशा अटकावून ठेवण्याचा मुदतीपैकी (दोन वर्षाहून अधिक नाही अशा) कोणत्याही मुदतीचे तितक्याच मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेत रुपांतर करण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

---

१. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १५, कलम २(१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अपराधांची संक्षिप्त चौकशी करणे.

**७.** कलम ११ खालील अपराध खेरीज करून या अधिनियमाखालील सर्व अपराधांची संक्षिप्त रीतीने चौकशी केली पाहिजे.

आईबापांनी खर्चाबाबत रकमा देणे.

**८.** (१) कलम ५ किंवा कलम ६ अन्वये कोणाही व्यक्तीस प्रमाणित संस्थेत, अटकावून ठेवण्याविषयी आदेश देणाऱ्या न्यायालयास, उक्त व्यक्तीच्या आईबापास किंवा त्यास पोसण्यास जबाबदार असलेल्या इतर व्यक्तीस, तसे करण्यास तो समर्थ असल्यास, उक्त व्यक्तीस पोसण्यासाठी लागणाऱ्या खर्चाबाबत, विहित केलेल्या रीतीने, रकमा देण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार आहे.

(२) असा कोणताही आदेश देण्यापूर्वी न्यायालयाने उक्त व्यक्तीच्या आईबापांच्या किंवा त्यास पोसण्यास जबाबदार असलेल्या इतर व्यक्तीच्या परिस्थितीविषयी चौकशी केली पाहिजे आणि काही पुरावा असल्यास तो, यथास्थिति, आईबापांच्या किंवा अशा इतर व्यक्तीच्या समक्ष नमूद केला पाहिजे.

(३) खर्च देण्यास जबाबदार असलेल्या पक्षाकडून आलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा, या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशात फेरफार करण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

(४) *दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ४८८ अन्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी ज्या रीतीने करण्यात येते त्याच रीतीने ह्या कलमान्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करता येईल. १८९८ चा ५.

सर्वस्वी भिकाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

**९.** (१) जेव्हां कलम ५ किंवा कलम ६ अन्वये न्यायालयाने एखाद्या व्यक्तीस प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असेल तेव्हां, योग्य वाटेल ती चौकशी केल्यानंतर, अशा व्यक्तीवर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तींना तितक्याच मुदतीपर्यंत प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्याचा न्यायालयास अधिकार आहे :

परंतु, असा आदेश देण्यापूर्वी तो का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याची संधी अशा रीतीने अवलंबून असलेल्या व्यक्तींना दिली पाहिजे.

(२) अवलंबून असलेली व्यक्ती ही जेव्हां मूल असेल तेव्हां, न्यायालयाने तीस बाल-न्यायालयाकडे पाठविले पाहिजे व मुंबई बाल अधिनियम, १९४८, कलम ४०, कंडिका (अ) यात वर्णन केल्याप्रमाणे ती मूल आहे असे समजून बाल-न्यायालयाने तिची व्यवस्था करावी : १९४८ चा मुंबई ७१.

परंतु, जेव्हां अवलंबून असलेली व्यक्ती पांच वर्षे वयाहून कमी असून भिकाऱ्याचे स्वतःचे मूल असेल व भिकारी संसर्गजन्म महारोगाने पीडित नसलेला किंवा वेडी नसलेली अशी धडधाकट आई असेल तेव्हां, असे मूल पांच वर्षाचे होईपर्यंत अटकावून ठेवण्याच्या जागेच्या संबंधात आईपासून वेगळे न करता प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे ; व त्यानंतर ह्या पोट-कलमान्वये तरतूद केल्याप्रमाणे तिची व्यवस्था करण्यात येईल.

(३) ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता, आवश्यक असल्यास अवलंबून असलेल्या व्यक्तीस अटक करून आपणासमोर आणण्यास सांगण्याचा आणि वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तिची तपासणी करवून घेण्याचा न्यायालयास अधिकार आहे. ह्या पोट-कलमान्वये केलेल्या प्रत्येक अटकेच्या, दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१ याचे उपबंध लागू असतील ; आणि अटक केलेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करण्यात १८९८ चा ५.

* फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहावे.

येईपर्यंत पोलीस ठाणें किंवा विभाग (सेक्शन) स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्याने विहित केलेल्या रीतीने तिला ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**असाध्य रोग जडल्यामुळे असहाय्य भिकाऱ्यांना आणखी अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

**१०.** कलम ५ किंवा कलम ६ किंवा कलम ९ अन्वये प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवलेली कोणतीही व्यक्ती ही, तीने राज्य शासनाकडे केलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा, अंध, पंगू अगर असाध्य रोग जडल्यामुळे असहाय्य असल्याचे राज्य शासनास वाटल्यास, राज्य शासनास, अशा इसमाच्या अटकेची मुदत संपल्यानंतर तीस प्रमाणित संस्थेत आणखी बेमुदत अटकावून ठेवण्यांत यावे असा आदेश देण्याचा अधिकार आहे :

परंतु, राज्य शासनास योग्य वाटेल अशी कोणताही व्यक्ती जर अशा रीतीने अटकावून ठेवलेल्या व्यक्तीच्या राहण्याची व पालनपोषणाची व त्यास भीक मागूं न देण्याची किंवा भीक मागण्याच्या कारणासाठी तिचा उपयोग होऊ न देण्याची जबाबदारी स्वतःवर घेण्याबाबतचा मुचलका, राज्य शासन फर्मावील त्याप्रमाणे जामिनानिशी किंवा जामिनावाचून करून देईल तर, अशा रीतीने अटकावून ठेवलेल्या इसमास सोडून देण्याचा राज्य शासनास अधिकार आहे.

**भीक मागण्याकरिता व्यक्तीस कामावर लावल्याबद्दल किंवा त्यांना भीक मागण्यास लावल्याबद्दल किंवा भीक मागण्याच्या कारणांसाठी त्यांच्या उपयोग केल्याबद्दल शास्ति.**

**११.** जी कोणी व्यक्ती कोणत्याही व्यक्तीस भिक्षा मागण्याच्या किंवा घेण्याच्या कामावर लावील किंवा भिक्षा मागण्यास किंवा घेण्यास लावील, अगर ज्याच्याकडे मुलाची अभिरक्षा, ताबा किंवा देखरेख असेल अशी कोणी व्यक्ती अशा मुलास भिक्षा मागण्याच्या किंवा घेण्याच्या कामावर लावण्याकडे किंवा मुलास भिक्षा मागण्यास किंवा घेण्यास लावण्याकडे कानाडोळा करील किंवा तसे करण्यास उत्तेजन देईल किंवा जी कोणी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा भीक मागण्याच्या कारणासाठी प्रदर्शनाची वस्तु म्हणून उपयोग करील, ती, दोषी ठरविण्यांत आली असता, पराकाष्ठा तीन वर्षे मुदतीच्या परंतु एका वर्षापेक्षा कमी नसलेल्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल.

## प्रकरण तीन

## आदान केंद्रे व प्रमाणित संस्था

**आदान केंद्रांची तरतूद.**

**१२.** (१) राज्य शासनास योग्य वाटेल अशा एक किंवा अनेक ठिकाणी एका किंवा अधिक आदान केंद्राची तरतूद करण्याचा व ती चालू ठेवण्याचा अधिकार आहे. तसेच ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कोणत्याही संस्थेस आदान केंद्र म्हणून प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे.

(२) असे प्रत्येक आदान केंद्र अधीक्षकाच्या नियंत्रणाखाली राहील.

प्रमाणित संस्थांची तरतूद.

१३. (१) राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा एक किंवा अधिक ठिकाणी एका किंवा अधिक प्रमाणित संस्थांची तरतूद करण्याचा व त्या चालू ठेवण्याचा अधिकार आहे ; तसेच ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कोणत्याही संस्थेस प्रमाणित संस्था म्हणून प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे. अशा कोणत्याहि संस्थेत शेतीचे तसेच औद्योगिक व इतर धंदे शिकविण्याची व दाखल केलेल्या व्यक्तींच्या सर्वसाधारण शिक्षणाची व वैद्यकीय दृष्ट्या त्यांची निगा राखण्याची व्यवस्था करता येईल.

(२) अशी प्रत्येक प्रमाणित संस्था अधीक्षकाच्या देखरेखीखाली असेल.

निरीक्षक समित्या.

१४. प्रत्येक आदान केंद्रासाठी व प्रत्येक प्रमाणित संस्थेसाठी राज्य शासन विहित करण्यांत येईल अशा रीतीने, एक निरीक्षक समिति नेमील.

सल्लागार समित्या.

१५. (१) कलम १, पोट-कलम (३) मध्ये तरतूद कलेल्या रीतीने हा अधिनियम अंमलात आला असेल अशा कोणत्याहि क्षेत्रासाठी एक सल्लागार समिति बनविण्याचा राज्य शासनास अधिकार आहे ; अशी समिती राज्य शासन नेमील अशा एकवीसपेक्षा अधिक नसलेल्या व्यक्तींची असेल :

परंतु, जेव्हां एखाद्या स्थानिक प्राधिकाऱ्याने त्याच्या क्षेत्राधिकाराखाली असलेल्या क्षेत्रातील भिकारी ज्यांत अटकावून ठेवण्यात आले असतील अशा प्रमाणित संस्था चालविण्याकरिता प्रत्येक बाबतीत राज्य शासनास योग्य वाटेल अशी आर्थिक मदत देण्याचे कबूल केले असेल तेव्हा, राज्य शासन अशा क्षेत्राकरिता सल्लागार समितीवर त्यास योग्य वाटतील इतक्या व्यक्ती नेमील. अशी व्यक्ती अशा स्थानिक प्राधिकाऱ्याचे प्रतिनिधी असतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याहि स्थानिक क्षेत्रांकरिता बनविण्यांत आलेल्या सल्लागार समितीस किंवा तिच्या कोणत्याही सदस्यास सर्व वाजवी वेळी व अधीक्षकास योग्य ती नोटीस दिल्यानंतर अशा क्षेत्रांतील भिकारी जीत अटकावून ठेवले असतील अशा कोणत्याहि प्रमाणित संस्थेला भेट देण्याचा अधिकार आहे.

(३) तसेच सल्लागार समितीस पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :—

(क) मुख्य निरीक्षक किंवा राज्य सरकार निर्दिष्ट करील असा कोणताहि अधिकारी याच्याद्वारे कोणत्याहि प्रमाणित संस्थेस तिच्या व्यवस्थेबाबत सल्ला देणे ;

(ख) स्थानिक क्षेत्रांतील किंवा ज्यांत त्या क्षेत्रांतील भिकारी अटकावून ठेवण्यांत आले असतील अशा कोणत्याहि किंवा सर्व प्रमाणित संस्थांचे आवर्तक तसेच अनावर्तक खर्च भागविण्याकरिता वर्गणी गोळा करणे ; व गोळा केलेल्या वर्गणीचा विनियोग विहित केलेल्या रीतीने करणे ;

(ग) स्थानिक क्षेत्रांतील कोणत्याहि संस्थेस प्रमाणित संस्था म्हणून प्रमाणपत्र देण्याविषयी किंवा कोणत्याहि प्रमाणित संस्थेचे प्रमाणपत्र काढून घेण्याविषयी राज्य शासनास मुख्य निरीक्षकाद्वारे सल्ला देणे ;

(घ) साधारणपणे अशा क्षेत्रांत ह्या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधी व विशेषकरून मुख्य निरीक्षकाने किंवा राज्य शासनाने निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि इतर अधिकाऱ्याने तिजकडे लिहून पाठविलेल्या कोणत्याहि मुद्यांसंबंधी राज्य शासनाने सल्ला देणे.

स्थानिक प्राधिकरणांनी अंशदानाच्या रकमेचा भरणा करणे व तिची वसुली.

**१६.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याहि विधीत काहीहि असले तरी प्रमाणित संस्था चालविण्याकरिता विवक्षित रक्कम देण्याचे ज्या स्थानिक प्राधिकरणाने कबूल केले असेल, त्याने याबाबत विहित करण्यात आलेल्या तारखेपूर्वी अशा रकमेचा भरणा राज्य शासनाकडे केला पाहिजे.

(२) जर विहित करण्यात आलेल्या तारखेपूर्वी स्थानिक प्राधिकाऱ्याने कोणत्याहि रकमेचा भरणा केला नाही तर, स्थानिक प्राधिकाऱ्याचा अधिकारी, खजिनदार किंवा बँकर म्हणून किंवा अन्यथा स्थानिक प्राधिकाऱ्याच्या वतीने कोणताहि पैसा ज्याच्या ताब्यात असेल अशा कोणत्याहि व्यक्तीस त्याच्या हाती असलेल्या किंवा वेळोवेळी त्याजकडे आलेल्या पैशांतून अशा रकमेचा भरणा राज्य शासनाकडे करण्याविषयी आदेश देण्याचा राज्य शासनास अधिकार आहे आणि अशा व्यक्तीस असा आदेश पाळणे भाग पडेल. अशा आदेशानुसार भरलेल्या प्रत्येक रकमेमुळे, त्याने अशा रीतीने भरणा केलेल्या स्थानिक प्राधिकाऱ्याच्या पैशांतून त्याने दिलेल्या कोणत्याहि रकमेबाबत अशा स्थानिक प्राधिकाऱ्याच्या सर्व जबाबदारींतून अशा व्यक्तीची पुरेशा रीतीने मुक्तता होईल.

मुख्य निरीक्षक, अप्पर मुख्य निरीक्षक, निरीक्षक, साहाय्यक निरीक्षक व परिवीक्षा अधिकारी यांची नेमणूक.

**१७.** (१) या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता, राज्य शासनास, प्रमाणित संस्थांचा एक अप्पर मुख्य निरीक्षक, प्रमाणित संस्थांचा एक अपर मुख्य निरीक्षक, एक निरीक्षक व मुख्य निरीक्षकास साहाय्य करण्याकरिता राज्य शासनास इष्ट वाटतील इतके साहाय्यक निरीक्षक आणि परिवीक्षा अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे ; आणि मुख्य निरीक्षकास साहाय्य करण्याकरिता अशा रीतीने नेमण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस राज्य शासन निदेश देईल असे मुख्य निरक्षिकाचे अधिकार असतील व त्याची अशी कर्तव्ये पार पाडावी लागतील, परंतु त्याने मुख्य निरीक्षक जे निदेश देईल त्याप्रमाणे वागले पाहिजे.

"राज्य शासनास, ते लादील अशा (कोणत्याही असल्यास) निर्बंधांना व शर्तींना अधीन राहून, आदेशाद्वारे, परिवीक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतची शक्ती मुख्य निरीक्षकाकडून कमी दर्जाची नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास प्रदान करता येईल.

(२) प्रत्येक आदान केंद्राची व प्रत्येक प्रमाणित संस्थेची तपासणी मुख्य निरीक्षकाकडून, निरीक्षकाकडून, साहाय्यक निरीक्षकाकडून किंवा परिवीक्षा अधिकाऱ्याकडून प्रत्येक सहा महिन्यांतून निदान एकदा तरी करण्यात आली पाहिजे.

आदान केंद्रे व प्रमाणित संस्था यांतील झडती.

**१८.** आदान केंद्राच्या किंवा प्रमाणित संस्थेच्या अधीक्षकास असा आदेश देण्याचा अधिकार आहे की, आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत दाखल केलेल्या कोणत्याहि व्यक्तीची झडती घेण्यात आली पाहिजे, त्या व्यक्तीस स्वच्छ करण्यात आले पाहिजे, तिच्या मालकीच्या वस्तू तपासण्यात आल्या पाहिजेत आणि त्याच्या जवळ किंवा तिच्या अंगावर जे काही पैसे किंवा ज्या काही मौल्यवान जिनसा आढळतील त्या अधीक्षकाच्या अभिरक्षेत ठेवण्यात आल्या पाहिजेत, व अशा रीतीने आढळलेल्या पैसे व मौल्यवान वस्तूव्यतिरिक्त इतर वस्तूंची विहित केलेल्या रीतीने विल्हेवाट लावण्यात आली पाहिजे. जेव्हा न्यायालयाने अशा कोणत्याही व्यक्तीस अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असेल तेव्हा, अधीक्षकास अशा व्यक्तीजवळ किंवा त्याच्या अंगावर आढळलेल्या कोणत्याहि पैशाची किंवा मौल्यवान वस्तुंची विहित केलेल्या, रीतीने विल्हेवाट लावण्यात आली पाहिजे असा आदेश देण्याचा अधिकार आहे. जेव्हा न्यायालय कोणत्याहि अशा व्यक्तीच्या बाबतीत त्यास अटकावून ठेवण्याच्या आदेशाव्यतिरिक्त इतर कोणताही आदेश देईल तेव्हा, तिचे पैसे व मौल्यवान वस्तू त्यास परत देण्यात आल्या पाहिजेत आणि जर तिचे कपडे नष्ट करण्यात आले असतील तर तिला नवीन कपडे पुरविण्यात आले पाहिजेत, असे कपडे पुरविण्यांचा खर्च राज्य विधानमंडळाने तरतूद केलेल्या पैशातून देण्यात येईल :

परंतु स्त्रीची झडती फक्त स्त्रीकडून घेण्यात आली पाहिजे व त्यावेळी सभ्यतेच्या मर्यादा योग्य रीतीने पाळण्यात आल्या पाहिजेत.

---

१. हा मजकूर सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम द्वारे जादा दाखल करण्यात आला.

व्यवस्था व शिस्त.

**१९.** ह्या अधिनियमान्वये आदान केंद्रात व प्रमाणित संस्थांत परावर्तित किंवा अटकावून ठेवलेल्या व्यक्तींनी व्यवस्था व शिस्त याबाबत वेळोवेळी विहित करण्यात येतील असे नियम पाळले पाहिजेत. अशा नियमांत, अशा कोणत्याहि नियमांचा भंग केल्याबद्दल शिक्षेदाखल अंगमेहनतीचे किंवा इतर काम देणे व शिक्षा देणे या गोष्टींचा समावेश होईल.

शिस्त भंगाबद्दल कैदेची शिक्षा.

**२०.** (१) प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवलेला जी कोणताहि व्यक्ती निकटपूर्वीच्या कलमांत उल्लेख केलेल्या कोणत्याहि नियमांचे नेहमी बुध्दया उल्लंघन करील किंवा तो पाळण्यांत हयगय करील त्याचे मुख्य निरीक्षक किंवा अधीक्षक न्यायालयास कळवील आणि त्यानंतर अशा व्यक्तीने अशा कोणत्याहि नियमांचे बुध्दया उल्लंघन केले आहे किंवा तो पाळण्यात हयगय केली आहे अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, न्यायालयास, प्रमाणित संस्थेत अशा इसमास अटकावून ठेवण्याच्या शिल्लक राहिलेल्या मुदतीचे किंवा तिच्या भागाचे कैदेच्या शिक्षेत रूपांतर करण्याचा अधिकार आहे. यामुळे निकट-पूर्वीच्या कलमान्वये शिस्त भंगाबद्दल जो कोणताहि इलाज करता येईल त्यास बाध येणार नाही.

(२) वर सांगितल्याप्रमाणे दिलेली कैदेची शिक्षा ही, कलम ६ अन्वये दिलेली शिक्षा ज्या रीतीने अंमलात आणली जाते त्याच रीतीने अंमलात आणली जाईल.

एका आदान केंद्रांतून किंवा प्रमाणित संस्थेतून दुसऱ्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत स्थानांतरण.

**२१.** (१) विहित केलेल्या शर्तीस अधीन राहून, मुख्य निरीक्षकास, आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवलेल्या इसमाचे राज्यातील दुसऱ्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत स्थानांतरण करण्याचा अधिकार आहे :

परंतु, अशा स्थानांतरणामुळे अशा व्यक्तींची अटकावून ठेवण्याची एकूण मुदत वाढता कामा नये.

(२) असे स्थानांतरण करतेवेळी मुख्य निरीक्षकाने वैद्यकीय प्रमाणपत्राकडे व कलम २६ अन्वये राज्य शासनाने किंवा न्यायालयाने जे कोणतेहि निदेश दिले असतील त्याकडे लक्ष पुरविले पाहिजे.

लायसेन्सवर सोडून देणे.

**२२.** (१) विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून—

(क) मुख्य निरीक्षक किंवा प्रमाणित संस्थेचा अधीक्षक यास, प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवलेल्या व्यक्तीला अल्प मुदतीकरिता गैरहजर राहण्यास कोणत्याहि वेळी परवानगी देण्याचा अधिकार आहे.

(ख) मुख्य निरीक्षकास अशा व्यक्तीला कोणत्याही वेळी सशर्त सोडून देण्याच्या व त्यासाठी त्यास लायसेन्स देण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेले कोणतेहि लायसेन्स हे आधीच रद्द करण्यात आलेले नसल्यास, अशा व्यक्तीस ज्या मुदतीपर्यंत प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्यात आला असेल ती मुदत संपेपर्यंत अंमलात राहील.

(३) अशी व्यक्ती ह्या कलमान्वये त्यास दिलेली परवानगी किंवा लायसेन्स अंमलात असतांना ज्या मुदतीपर्यंत प्रमाणित संस्थेतून गैरहजर असेल ती मुदत, त्याची प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याची मुदत मोजण्याच्या कारणासाठी, त्यास अटकावून ठेवण्याच्या मुदतीचा भाग म्हणून समजण्यात येईल.

लायसेन्स रद्द करणे.

**२३.** (१) विहित केलेल्या शर्तीस अधीन राहून, कलम २२ अन्वये देण्यात आलेले लायसेन्स मुख्य निरीक्षकास कोणत्याहि वेळी रद्द करता येईल, आणि त्यानंतर सोडून देण्यात आलेल्या व्यक्तींस ज्या मुदतीपर्यंत त्यास अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असेल ती मुदत संपेपर्यंत प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्यात येईल.

(२) ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता मुख्य निरीक्षकास, सोडून दिलेल्या व्यक्ती आवश्यक असल्यास, अटक करविण्याचा व त्यास अटकावून ठेवण्याबाबतच्या आदेशाच्या एका प्रतीसह अगदी नजीकच्या आदान केंद्रात पाठविण्याचा अधिकार आहे, आणि त्यानंतर कलम २५, पोट-कलम (१) चे उपबंध, शक्य असेल तेथवर, लागू होतील.

**२४.** कलम २२ अन्वये कोणत्याही व्यक्तीस लायसेन्सवर सोडून दिल्याच्या तारखेपासून तीन महिने संपल्यानंतर कोणत्याही वेळी मुख्य निरीक्षकाची खात्री झाली की, अशीव्यक्ती भीक मागण्यापासून परावृत होण्याचा संभव आहे तर, त्याला बिनर्शत सोडून देण्याविषयी राज्य शासनाकडे शिफारस करण्याचा मुख्य निरीक्षकास अधिकार आहे. अशा शिफारशीवरून अशा व्यक्तीला बिनशर्त सोडून देण्याचा राज्य शासनास अधिकार आहे, आणि त्याला अशा रीतीने सोडून दिल्यावर प्रमाणित संस्थेत त्याला ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असेल ती मुदत संपली असें समजण्यांत येईल. बिनशर्त सोडून देणे

## प्रकरण चार

## संकीर्ण

**२५.** (१) कलम ५ किंवा कलम ६ किंवा कलम ९ अन्वये जेव्हां एकाद्या व्यक्तीच्या बाबतींत त्यास प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याबद्दल आदेश देण्यात आला असेल तेव्हा, पोट-कलम (२) च्या उपबंधास अधीन राहून अटकावून ठेवण्याबद्दल आदेश देणाऱ्या न्यायालयाने त्यास अगदी नजीकच्या आदान केंद्रांत ताबडतोब पाठविलें पाहिजे व त्याचवेळी त्यास अटकावून ठेवण्याच्या आदेशाची प्रत पाटविली पाहिजे. त्यानंतर त्या व्यक्तीस आदान केंद्राच्या अधीक्षकाच्या हवाली करण्यांत आले पाहिजे आणि तेथून प्रमाणित संस्थेत पाठविण्यांत येईपर्यंत त्यास आदान केंद्रांत अटकावून ठेवले पाहिजे. अटकावून ठेवण्याचा आदेश दिल्यावर किंवा कैदेची शिक्षा दिल्यावर अनुसरावयाची कार्यरीती

(२) कोणत्याही अशा व्यक्तीस जेव्हा कैदेची शिक्षासुध्दा झाली असेल तेव्हा, कैदेची शिक्षा देणाऱ्या न्यायालयाने ज्या तुरुंगांत त्यास ठेवावयाचे असेल त्या तुरुंगाकडे एक अधिपत्र ताबडतोब पाठविले पाहिजे आणि अधिपत्र व अटकावून ठेवण्याचा आदेश यांसह त्यास अशा तुरुंगाकडे रवाना केले पाहिजे. कैदेच्या शिक्षची पूर्णपणे अंमलबजावणी झाल्यानंतर जर अशा व्यक्तीची प्रमाणित संस्थेत अटकत राहण्याची मुदत शिल्लक राहिली असेल तर, शिक्षेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने त्यास अटकावून ठेवण्याच्या आदेशाच्या प्रतीसह अगदी नजीकच्या आदान केंद्रांत पाठविलें पाहिजे आणि मा पोट-कलम (१) चे उपबंध, शक्य असतील तेथवर, लागू होतील.

(३) कोणत्याही व्यक्तीस ज्या मुदतीपर्यंत प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्यांत आला असेल ती मुदत मोजतांना, ह्या कलमान्वये आदान केंद्रांत ज्या मुदतीपर्यंत तिला अटकावून ठेवण्यांत येईल ती मुदत हिशोबांत धरली पाहिजे.

**२६.** (१) न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवलेला कोणताही भिकारी विकृतचित किंवा महारोगी आहे असें राज्य शसनास वाटेल तेव्हां, राज्य शासनास,असा भिकारी विकृचित्त किंवा महारोगी आहे असें त्यास वाटण्याची कारणें आदेशांत नमूद करून, अशा व्यक्तीस वेडयांच्या इस्पितळांत किंवा कुष्ठालयांत किंवा इतर सुरक्षित ठिकाणी हलविण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे. अशा भिकाऱ्यास, राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे, त्यास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश दिलेला असेल त्या मुदतीच्या उरलेल्या काळांत किंवा ती मुदत संपल्यावर वैद्यकीय अधिकाऱ्यानें असें प्रमाणित केले की भिकाऱ्याच्या किंवा इतरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें त्यास वैद्यकीय व्यवस्थेखाली किंवा उपचाराखाली आणखी अटकावून ठेवणें आवश्यक आहे तर, विधी अन्वये मुक्त करण्यांत येईपर्यंत त्यास त्या ठिकाणी ठेवलें पाहिजे व त्याच्यावर उपचार केले पाहिजेत. महारोगी व वेडे यांची वैद्यकीय तपासणी व त्यांस अटकावून ठेवणें.

(२) राज्य शासनास जेव्हा असे वाटले की, भिकारी विकृतचित्त असण्याचे बंद झाले आहे किंवा तो महारोगापासून बरा झाला आहे तेव्हा राज्य शासनाने ज्या व्यक्तीच्या ताब्यात भिकारी असेल त्या व्यक्तीस आदेशाद्वारे निदेश देऊन, जर भिकारी अजूनहि अभिरक्षेंत ठेवला जाण्यास पात्र असेल तर, भिकाऱ्यास ज्या प्रमाणित संस्थेमधून हलविण्यांत आले असेल त्या प्रमाणित संस्थेमध्ये पाठविले पाहिजे किंवा भिकारी त्यापुढे अभिरक्षेंत ठेवला जाण्यास पात्र नसेल तर, त्यास मुक्त करण्याचा आदेश दिला पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वयें वेडयाच्या इस्पितळांत किंवा कुष्ठालयांत ठेवलेल्या प्रत्येक भिकाऱ्यास, ज्या मुदतीपर्यंत त्यास अटकावून ठेवण्याचा आदेश देण्यांत आला असेल ती मुदत संपल्यानंतर, भारताचा वेड लागलेल्या इसमांबाबत अधिनियम, १९१२, कलम ३१ याचे उपबंध किंवा [पोट-कलम (२) च्या उपबंधांस अधीन राहून] महारोग्यांबाबत अधिनियम, १८९८, कलम १४ याचे उपबंध लागू होतील आणि एखाद्या भिकाऱ्यास त्या पोट-कलमान्वयें ज्या मुदतींत वेडयांच्या इस्पितळांत किंवा कुष्ठालयांत ठेवण्यांत आले असेल ती मुदत न्यायालयानें त्यास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असेल त्या मुदतीचा भाग म्हणून मोजली पाहिजे :

परंतु एखाद्या भिकाऱ्यास त्याच्या विकृतचित्तामुळे किंवा महारोगामुळे ताबडतोब हलविणें आवश्यक असेल तेव्हां, त्या गोष्टीबाबत राज्य शासनाचे आदेश मिळविण्यांत येतील त्या मुदतीपर्यंत, भिकाऱ्यास वेडयांच्या इस्पितळाच्या किंवा कुष्ठालयाच्या स्वाधीन करण्याकरितां ताबडतोब आदेश मिळविण्यासाठी ज्या संस्थेंत भिकाऱ्यास अटकावून ठेवण्यांत आलेले असेल त्या संस्थेच्या प्राधिकाऱ्यास, भारताचा वेड लागलेल्या इसमाबाबत अधिनियम, १९१२, अन्वये किंवा महारोग्यांबाबत अधिनियम १८९८, अन्वये क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

आदान केंद्रांतून किंवा प्रमाणित संस्थेंतून पळून जाणाऱ्या व्यक्तीस अटक.

**२७.** आदान केंद्राच्या किंवा प्रमाणित संस्थेच्या अधीक्षकाच्या परवानगीशिवाय असे केंद्र किंवा अशी संस्था सोडून जाणाऱ्या व्यक्तीस किंवा कलम २२, पोट-कलम (१) अन्वये गैरहजर राहण्यास परवानगी दिलेली मुदत संपल्यानंतर परत येण्यांत कसूर करणाऱ्या व्यक्तीस अधिपत्रावांचून अटक करण्याचा पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या आदान केंद्राच्या किंवा प्रमाणित संस्थेच्या अधिकाऱ्यास अधिकार आहे व तसेच अशा व्यक्तीस यथास्थिति, आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत परत पाठविण्याचाहि त्यास अधिकार आहे.

प्रमाणित संस्था व भारताच्या निरनिराळ्या भागांतील तशाच प्रकारची संस्था यांच्या दरम्यान स्थानांतरण

**२८.** (१) प्रमाणित संस्थेंत अटकावून ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीस भारताच्या इतर भागांतील तशाच प्रकारच्या कोणत्याहि संस्थेंत स्थानांतरण करण्याविषयी निदेश देण्याचा राज्य शासनास अधिकार आहे. मात्र त्या भागाच्या राज्य शासनाने तेथें अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधि अन्वयें त्या भागांतील अशा संस्थेची व्यवस्था [१] [महाराष्ट्र राज्यातील] व्यवस्थेप्रमाणे केलेली असली पाहिजे :

परंतु, ह्या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याहि इतर राज्यात स्थानांतरण त्या राज्याच्या शासनाच्या संमतिवांचून करता कामा नये.

(२) ज्या व्यक्तीच्या संबंधात भारताच्या इतर कोणत्याहि भागातील सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित संस्थेत किंवा तत्सम स्वरूपाच्या संस्थेत तिस अटकावून ठेवण्याबद्दल हया अधिनियमान्वये देण्यात येणाऱ्या आदेशासारखा अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीचे स्थानांतरण [१] [महाराष्ट्र राज्यातील] प्रमाणित संस्थेत करण्यास अशा संस्थेच्या अधीक्षकाशी सल्लामसलत करून संमती देण्याचा राज्य शासनास अधिकार आहे आणि अशा रीतीने स्थानांतरण करण्यात आल्यानंतर या अधिनियमाचे उपबंध अशा व्यक्तीच्या बाबतीत लागू होतील.

---

१ हे शब्द महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२९. (१) या अधिनियमान्वये प्रमाणित संस्थेंत अटकावून ठेवण्याविषयी ज्याच्या बाबत आदेश देण्यांत आला असेल अशा प्रत्येक व्यक्तीने कोणत्याहि वेळी, ज्यासाठी पोलीस कमिशनर नेमण्यात आला आहे अशा कोणत्याहि क्षेत्रात पोलीस कमिशनरास किंवा याबाबत त्यानें अधिकार दिलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास आणि इतरत्र जिल्हा फैजदारी न्यायाधिशास किंवा याबाबत त्याने अधिकार दिलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास आपल्या बोटांचे ठसे घेऊ दिले पाहिजेत.

बोटांचे ठसे घेण्याचा अधिकार.

(२) जो कोणी पोट-कलम (१) अन्वये आपल्या बोटांचे ठसे घेऊं देण्याचे नाकारील, तो, दोषी ठरविण्यांत आला असता, पुढील शिक्षेस पात्र होईल, म्हणजे त्याच्या प्रमाणित संस्थेत अटकावून ठेवण्याच्या तीन महिन्याहून अधिक नाही इतक्या मुदतीचे तितक्याच मुदतीच्या कैदेच्या शिक्षेत रुपांतर करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये देण्यांत आलेली कैदेची शिक्षा ही ज्या रीतीने कलम ६ अन्वये दिलेली शिक्षा अंमलांत आणली जाते त्याच रीतीने अंमलात आणली जाईल.

३०. (१) भिक्षा मागतांना आढळून आलेल्या व्यक्तीस कलम ४, पोट-कलम (१) अन्वये अटक करणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा इतर व्यक्तीला पुढे वर्णन केलेल्या कोणत्याही जनावरास, म्हणजे, ज्या जनावराचे क्षत, जखम, दुखापत, व्यंग, किंवा रोग अशा व्यक्तीने भिक्षा मिळविण्याच्या किंवा काढण्याच्या उद्देशाने लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आणले असेल किंवा त्यांचें प्रदर्शन केले असेल अशा जनावरास धरण्याचा अधिकार आहे.

भिक्षा मिळविण्यासाठी किंवा काढून घेण्यासाठी उघडी केलेली किंवा प्रदर्शित केलेली जनावरे धरणे व त्यांची विल्हेवाट लावणे

(२) अशा जनावराला न्यायालयासमोर हजर करण्यांत येईपर्यंत प्राण्यांस निर्दवतेने वागविण्यात प्रतिबंध करण्याबाबत अधिनिय, १८९०, कलम ६ब याअन्वये नेमून दिलेल्या रुग्णशाळेत अटकावून ठेवण्यासाठी तेथे त्यास नेण्याचा, अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास किंवा इतर व्यक्तीस अधिकार आहे.

(३) भिक्षा मागतांना आढळून आलेल्या व्यक्तीस ज्या न्यायालयासमोर आणण्यांत आले असेल त्या न्यायालयास असा निदेश हे याचा अधिकार आहे की, अशा जनावरास ते मुक्त करण्यास योग्य हाईपर्यंत अशा रुग्णशाळेत औषधोपचार केले पाहिजेत व त्याची शुश्रूषा केली पाहिजे किंवा त्यास पांजरपोळांत पाठविले पाहिजे किंवा जर, ज्या क्षेत्रांत ते जनावर आढळून आले ते क्षेत्र ज्याच्या अधिकाराखाली आहे असा पशुवैद्यकीय अधिकारी अगर प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९० कलम १५ अन्वये केलेल्या नियमांनी अधिकृत केलेला असा इतर पशुवैद्यकीय अधिकारी, ते बरे होण्यासारखे नाही किंवा निर्दयतेने वागविल्यावांचून त्यास हलविणें शक्य नाही असें प्रमाणपत्र देईल तर न्यायालयास असा निदेश देण्याचा अधिकार आहे की त्या जनावरास मारून टाकण्यांत आलें पाहिजे आणि जनावराची रुग्णशाळेतून मुक्तता झाल्यावर तें जप्त करण्यात यावे असा आदेश देण्याचाहि न्यायालयास अधिकार आहे.

(४) रूग्णशाळेत शुश्रूषेसाठी किंवा औषधोपचारासाठी पाठविण्यात आलेलं जनावर हें, न्यायालयानें तें पांजरपोळांत पाठविलें पाहिजे किंवा तें मारून टाकलें पाहिजे असा निदेश दिलेला नसल्यास, ज्या क्षेत्रांत अशी रूग्णशाळा आहे ते क्षेत्र ज्याच्या अधिकाराखाली आहे असा पशुवैद्यकीय अधिकारी अगर प्राण्यांस निर्दयतेनें वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम १५ अन्वयें केलेल्या नियमांनी अधिकृत केलेला असा इतर पशुवैद्यकीय अधिकारी याने तें रूग्णशाळेंतून मुक्त करण्यास योग्य आहे असें प्रमाणपत्र दिल्यावांचून अशा रूग्णशाळेंतून मुक्त करतां कामा नये. १८९० चा ११

अपराध दखली व जामीन घेण्यास अयोग्य असे समजणे..

**३१.** या अधिनियमाची कलमें ६ व ११ याखालील अपराध हे दखली व जामीन घेण्यास अयोग्य असे असतील.

व्यक्ती लोकसेवक समजणें.

**३२.** हया अधिनियमान्वयें कोणतेंही काम करण्यास अधिकार दिलेल्या सर्व व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे. १८६० चा ४५

सन १८९८ चा अधिनियम ५ अन्वयें घेतलेली बंधपत्रे

**३३.** दंड प्रक्रिया संहिता, १८९८, विभाग ४२ चे उपबंध शक्य असेल तेथवर, ह्या अधिनियमान्वयें घेतलेल्या बंधपत्रास लागू असतील. १८९८ चा ५

अपिलें.

**३४.** *दंड प्रक्रिया संहिता, १८९८ अन्वये करावयाच्या अपिलाच्या व फेरतपासणीच्या कारणांसाठीं, हया अधिनियमान्वयें देण्यांत येणारा अटकावून ठेवण्याचा आदेश (यांत कलम ५ अन्वयें अटकावून ठेवण्याच्या आदेशाचा समावेश होतो) हा, जितक्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याविषयीं दिलेला असेल तितक्याच मुदतीच्या कैदेची शिक्षा म्हणून समजण्यांत आली पाहिजे. १८९८ चा ५

नियम.

**३५.** (१) राज्य शासनास, **राजपत्रांत प्रसिध्द** केलेल्या अधिसूचनेद्वारें, हया अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम, ते कायम करण्यापूर्वी आगाऊ प्रसिध्द करण्यांत आले पाहिजेत.

(२) विशेषकरून व वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा नियमांत पुढीलपैकी सर्व गोष्टींची किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टीची तरतूद करतां येईल :-

(क) कलम २, पोट-कलम (१), कंडिका (१) अन्वयें कार्य ज्या रीतीनें अधिकृत करतां येईल ती रीत ;

(ख) कलम ४, पोट-कलम (३) किंवा कलम ९ यांन्वयें अटक केलेल्या व्यक्तीस ठेवण्याची रीत ;

* फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहावा.

(ग) कलम ५, पोट-कलम (१), अन्वयें संक्षिप्त चौकशी करण्याची रीत ;

(घ) प्रमाणित संस्थेंत अटकावून ठेवलेल्या व्यक्तीच्या पोषणांसाठी कलम ८, पोट-कलम (१) अन्वयें ज्या रीतीनें रकमा देण्याविषयीं आदेश देण्याचा अधिकार आहे ती रीत ;

(ङ) कलम १४ अन्वयें निरीक्षक समिति नेमण्याची रीत ;

(च) सल्लागार समित्यांचे कामकाज चालविणें ;

(छ) कलम १६, पोट-कलम (१), अन्वयें ज्या तारखेपूर्वी भरणा केला पाहिजे ती तारीख ;

(ज) कलम १८ मध्यें उल्लेख केलेली चीजवस्तू व पैसे व मौल्यवान वस्तू यांची विल्हेवाट लावण्याची रीत ;

(झ) आदान केंद्रांत व प्रमाणित संस्थेंत अटकावून ठेवलेल्या व्यक्तींची व्यवस्था व शिस्त, आणि या कंडिकेन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या भंगाबद्दल अंगमेहनतीचे व इतर काम लादणे व शिक्षा करणे ;

(ञ) कलम २१ अन्वये ज्या शर्तीस अधीन राहून, मुख्य निरीक्षकास स्थानांतर करण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार आहे त्या शर्ती ;

(ट) कलम २२ अन्वये ज्या शर्तीस अधीन ठेवून कोणाही व्यक्तीस लैसेन्सवर सोडून देण्याचा अधिकार आहे त्या शर्ती ;

(ठ) कलम २३ अन्वये ज्या शर्तीस अधीन राहून लैसेन्स रद्द करता येईल त्या शर्ती ;

(ड) भिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीची रीत ;

(ढ) विहित करण्यात आली पाहिजे किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब.

(३) ह्या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर तीस दिवसाहून कमी नाही इतके दिवस विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवले पाहिजेत व ते अशा रीतीने ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्या अधिवेशनाच्या लगेच पुढील अधिवेशनात विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील त्या फेरफारांस अधीन असतील.

**३६.** ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या कामी कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, **राजपत्रात प्रसिध्द** केलेल्या आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी तरतूद करण्याचा किंवा असा निदेश देण्याचा अधिकार आहे. अडचणी दूर करणे.

# अनुसूची

[कलम १ (४) पहा]

| क्रमांक व वर्ष | लघु संज्ञा | कोणत्या मर्यादेपर्यंत रद्द केला ते. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| सन १९४५ चा मुंबई अधिनियम, २३ | मुंबईचा भिकाऱ्यांबाबत अधिनियम, १९४५. | संपूर्ण. |
| सन १९५१ चा मुंबई अधिनियम, २२ | मुंबई पोलीस अधिनियम, १९५१. | कलम ११४. |
| १३५० फसलीचा हैदराबाद अधिनियम, २० | भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १३५० फसली. | संपूर्ण. |
| सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम, २. | नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८. | विभाग ३१. |
| सन १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम, २. | मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२. | कलम २०६. |
| सन १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम, ३८. | मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक स्वराज्य अधिनियम, १९४८. | कलम १२९. |
| सन १९५४ चा सौराष्ट्र अधिनियम, १८. | सौराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५४. | कलम १०४. |
| सन १८९० चा मुंबई अधिनियम, ४. | कच्छ (कायदे लागू करणे) आदेश, १९४९ अन्वये मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९०. | कलम ६१. कंडिका (२) |

शा. मु. औ.-(एच) २७९-६०५० पुस्तके-११-२००६.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद